B.A (Part III) Semester VI Examination
(Optional Subject)

# POLITICAL SCIENCE

2020

(Concepts of Western and Indian Thinkers)

Time 3 Hours

(मराठी माध्यम)

Max Marks : 80

सूचना - सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

प्र.१ला - खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

अ] राज्याच्या वर्गीकरणाबाबत ॲरिस्टॉटलच्या विचारांची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा? 4

ब] महात्मा गांधींनी मांडलेल्या रामराज्य या संकल्पनेचा अर्थ लिहा। 4

क] निरंकुशतंत्र आणि कुलीनतंत्र या राज्याच्या प्रकारांचा अर्थ लिहा 4

ड] म. गांधींच्या आदर्श राज्याचे वा रामराज्याचे मूळ सर्वोदयाची भावना आहे या विधानाचा अर्थ स्पष्ट करा। 4

किंवा

इ] ॲरिस्टॉटलने मांडलेला राज्याच्या परिवर्तनाचा सिद्धांत स्पष्ट करा

फ] महात्मा गांधींच्या रामराज्याची वैशिष्ट्ये लिहा.

ग] ॲरिस्टॉटलच्या राज्याच्या वर्गीकरणाचे टिकात्मक परिक्षण करा

ह] महात्मा गांधींनी आधुनिक राज्य व राजकीय संस्था यातील टिकात्मक परिक्षण करा?

प्र.२रा वॉल्टर बॅजेटचे लोकशाही संबंधीचे विचार स्पष्ट करा। 16

किंवा

डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भारतातील संसदीय लोकशाही संबंधीचे विचार लिहा.

प्र.३रा योग्य पर्याय निवडा 16

१) मॅक्यावेली ---- प्रभावीपणे समर्थन करतो?
अ] वंशवादी राजकारणाचे ब] धर्माधिष्ठीत राजकारणाचे
क] सत्तेच्या राजकारणाचे ड] गरवादी राजकारणे.

२) ---- हे मॅक्यावेलीच्या राजकीय तत्वज्ञानाचे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे
अ] आदर्शवाद ब] अध्यात्मवाद क] भौतिकवाद ड] नैतिकवाद

३) राष्ट्रीय ऐक्याची उपयुक्तता फार मोठी आहे कारण राष्ट्रवादात ---- प्रभावित करण्याचे सामर्थ्य आहे असे मॅक्यावेली म्हणतो.
अ] भौतिक परिणाम ब] अभौतिक परिणाम क] ऐतिहासिक परिणाम
ड] लष्करी परिणाम

४) स्वामी विवेकानंदाचा राष्ट्रवाद हा ---- आधारित आहे.
अ] विज्ञानावर ब] भौतिकवादावर क] हिंदू धर्म श्रेष्ठत्वाच्या विचारांवर
ड] धर्म व अध्यात्मावर

५) ---- हे आपले मुख्य उद्दिष्ट असल्याचे स्वामी विवेकानंद स्पष्ट करतात
अ] वैदिक तत्वज्ञानाचा प्रसार ब] हिंदु धर्म व संस्कृतीचा प्रसार
क] मनुष्य निर्माण ड] जगात नव विचारांचा प्रसार

६) विवेकानंदाच्या राष्ट्रवाद एका बाजुला धर्म आहे तर दुसऱ्या बाजुला ---- समृध्द असा वारसा आहे

• अ] प्राचीन भारतीय सभ्यतेचा ब] भारतीय संस्कृतीचा

क] संस्कृत भाषिक ग्रंथांमधील ज्ञानभंडाराचा

ड] कर्मयोगाच्या सिध्दांताचा

७) विवेकानंदाची राष्ट्रवादाची कल्पना --- पुज्यभावावर आधारित आहे

अ] हिंदु धर्माबाबतच्या ब] अद्वैत सिध्दांताबाबतच्या

क] स्त्रियांबाबतच्या ड] आध्यात्मिक एकीकरणाबाबतच्या

८) सावरकरांच्या मते एक राष्ट्रत्व निर्माण व्हायचे असेल तर त्यासाठी --- आवश्यक असतात.

अ] समान इतिहास व समान भुप्रदेश या दोन गोष्टी

ब] आर्थिक व राजकीय आशा-आकांक्षा या दोन गोष्टी

क] परंपरा, हित व ध्येयवाद या तीन गोष्टी

ड] समान धर्म व समान जन्मभूमी या दोन गोष्टी.

९) वि. दा. सावरकरांच्या हिंदु राष्ट्रवादाचे ध्येय ② संस्कृती ③ --- ④ परंपरा व संस्कृती हे चार मुख्य घटक आहे

अ] भाषा ब] धर्म क] जन्मभूमी ड] राजकीय आशा-आकांक्षा

१०) हिंदू या शब्दाच्या व्याख्येचा मुळ ऐतिहासिक पाया --- हाच असला पाहिजे असे सावरकर म्हणतात.

अ] धर्म ब] वंश क] भारतभूमी ड] प्राचीन सभ्यता.

११) मुस्लीम राष्ट्र व हिंदुराष्ट्र यांच्यात संघर्ष आहे दोन राष्ट्रवादी भावनांचाही संघर्ष आहे --- असा सिध्दांत आहे

अ] वि. दा. सावरकर ब] बॅरिस्टर महंमदअली जीना

क] स्वामी विवेकानंद ड] निकोलो मॅक्यावेली

१२) ब्रिटिश सरकारने अंदमानच्या तुरुंगातून सुटका करून रत्नागिरीला ---- रवानगी केली.

अ] स्वामी विवेकानंद ब] वि. दा. सावरकर

क] निकोलो मॅक्यावेली ड] यापैकी नाही.

१३) भारतीय समाजात धर्मविचारांच्या आधारे सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे कोणी केले.

अ] वि. दा. सावरकर ब] स्वामी विवेकानंद

क] निकोलो मॅक्यावेली ड] वरील सर्व

१४) देशाचे स्वातंत्र्य हेच व्यक्तिच्या स्वातंत्र्याचे मुळ आहे कोणाच्या मते

अ] स्वामी विवेकानंद ब] निकोलो मॅक्यावेली

क] वि. दा. सावरकर ड] महंमद अली जीना.

१५) मॅक्यावेली हा इटालियन विचारवंत कोणत्या शतकातील होय

अ] १५ व्या ब] १६ व्या क] १७ व्या ड] १९ व्या

१६) राज्यात शांतता आणि स्थैर्य टिकवून ठेवण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राष्ट्रीय ऐक्य असणे आवश्यक आहे असे कोणी म्हटले.

अ] निकोलो मॅक्यावेली ब] वि. दा. सावरकर

क] स्वामी विवेकानंद ड] महात्मा गांधी

प्र. ४ था खालील प्रश्न थोडक्यात लिहा

अ] मार्क्सची साम्यवादाची संकल्पना लिहा ४

ब] नेहरूंच्या समाजवादावरील निष्ठा बळकट होण्याची कारणे लिहा ४

क] राममनोहर लोहियांच्या समाजवादावरील विचारांची आधारभूत तत्वे सांगा ४

ड] मार्क्सचे राज्यासंबंधीचे विचार स्पष्ट करा ४

किंवा

इ] मार्क्सचा अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत स्पष्ट करा

फ] नेहरूंच्या लोकशाही समाजवादाची वैशिष्ट्ये लिहा

ग] राममनोहर लोहिया यांनी मांडलेला भारतीय समाजवाद स्पष्ट करा

ह] मार्क्सच्या वर्गसंघर्षाच्या सिद्धांताचे टिकात्मक परिक्षण करा?

प्र. ५ वा डेव्हिड ईस्टन च्या वर्तनवादी दृष्टीकोना संबंधीचे विचार स्पष्ट करा? १६

किंवा

जॉन ऑस्टिनच्या सार्वभौमत्वाच्या सिद्धांताचे टिकात्मक परिक्षण करा.